# जाहीर नोटीस(१)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे चिखली येथील गट नं. ९३ पै मधील श्री. बसंत तोताराम सुखवाणी यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १/१३० ( मैला शुध्दीकरण केंद्र ),१८.०० मी. रुंद रस्ता, तसेच १८.०० मी. व २४.०० मी. रस्त्याची गोलाई या प्रयोजनाने बाधित होणारे ४०००.०० चौ. मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे चिखली, गट नं. ९३ पै., आरक्षण क्र. १/१३० ( मैला शुध्दीकरण केंद्र ),१८.०० मी. रुंद रस्ता, तसेच १८.०० मी. व २४.०० मी. रस्त्याची गोलाई :- ( बाधित क्षेत्र- ४०००.०० चौ. मी. )

उत्तरेस :- लागू गट नं. ९३ पै. ची मिळकत
पुर्वेस :- लागू गट नं. ९२ ची मिळकत व मौजे मोशीची शिव
दक्षिणेस :- लागू गट नं. ९० ची मिळकत.
पश्चिमेस:- लागू गट नं. ९० ची मिळकत

परिशिष्ट २)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे चिखली येथील गट नं. ७५२ पै. व १६५१ पै. मधील श्री. भानुदास मारुती मोरे व इतर तर्फे कुलमुखत्यारधारक मे. श्री. भगवती इन्फास्ट्रक्चर तर्फे भागीदार श्री. मनिषकुमार शंकरलाल पटेल यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्ता रुंदी या प्रयोजनाने बाधित होणारे अनुक्रमे १७४.५४ चौ. मी. व १२२.०० चौ. मी., तसेच गट नं. ७५२ पै. मधिल बांधकाम अयोग्य क्षेत्र ८५.५० चौ. मी. असे एकुण ३८२.०४ चौ. मी. जमीन त्यास चतुःसिमा खालील प्रमाणे

चतुःसिमा : -

मौजे चिखली, गट नं. ७५२ पै. व १६५१ पै. , १२.०० मी. रस्ता रुंदी व बांधकाम अयोग्य क्षेत्र

:- ( रस्ता बाधित -२९६.५४ चौ. मी. व बांधकाम अयोग्य -८५.५० चौ. मी. असे एकुण-३८२.०४ चौ. मी. )

उत्तरेस :- लागू गट नं. ७५२ पै. ची उर्वरित मिळकत.

पुर्वेस :- लागू गट नं. १६५१ पै. ची मिळकत

दक्षिणेस :- लागू गट नं. १६५१ पै. मिळकत व लागू रस्ता .

पश्चिमेस :- लागू गट नं. ७५२ पै. रस्ता.

परिशिष्ट ३)- मिळकतीचे वर्णन -तुकडी पुणे , पोट तुकडी मुळशी , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे थेरगाव स.नं. १०/१ पै., सि.स.नं. १७९० पै. येथील श्री. ओमप्रकाश मेवाराम वाजपेयी व श्रीम. रामादेवी ओमप्रकाश वाजपेयी यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकारणाचे मंजूर विकास योजनेतील २४.० मी रस्त्याने बाधित क्षेत्र २९२.८१ चौ.मी जमीन त्यास चतुःसिमा खालील प्रमाणे-

चतुःसिमा : -

पुर्व - सि .स.नं. १७९० पै.
पश्चिम - सि .स.नं. १७९० पै.
दक्षिण - सि .स.नं. १७९० पै.
ऊत्तर - सि .स.नं. १७९० पै.

परिशिष्ट ४)- मिळकतीचे वर्णन -तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे चिंचवड स.नं. १९०/२,१९१/अ/१,१९१/ब,१९२/अ व ब, सि.स.नं. ३८७६ पैकी मे. माईंड स्पेस रियालिटी प्रा. लि. यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जून्या हद्दीचे मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १८६ वाहनतळ या प्रस्तावाने बाधित होणारे क्षेत्र ३९१०.५३ चौ.मी पैकी २५००.५३ चौ.मी. क्षेत्र टीडीआर च्या बदल्यात व उर्वरित १४१०.०० चौ.मी. डी.आर. च्या बदल्यात ताब्यात घेणेबाबत जमीन त्यास चतुःसिमा खालील प्रमाणे-

चतुःसिमा : -

मौजे चिंचवड स.नं. १९०/२,१९१/अ/१,१९१/ब,१९२/अ व ब, सि.स.नं. ३८७६ पै.

आरक्षण क्र. १८६ वाहनतळ च्या चतुःसिमा : (एकूण बाधित क्षेत्र ३९१०.५३ चौ.मी. पैकी टीडीआर साठी २५००.५३ चौ.मी. क्षेत्र व डी आर साठी १४१०.०० चौ.मी. क्षेत्र)

उत्तरेस :- अस्तित्वातील रस्ता

पुर्वेस :- अस्तित्वातील रस्ता

दक्षिणेस :- सि.स.नं. ३८७६ पै. ची उर्वरित मिळकत

पश्चिमेस :- सि.स.नं. ३८७६ पै. ची उर्वरित मिळकत

उपसंचालक, नगररचना
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११०१८

जाहिरात क्रमांक १६८
दिनांक ३।२।१८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.